तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
✦ ₹ ६.०० रविवार दि. २२ डिसेंबर २०१९ बेळगाव • गोवा

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# 'निर्भया पथकांमुळे महिलांमध्ये विश्वास निर्माण होणार'



कोरेगाव : तालुक्यातील धाडसी युवतीचा सत्कार करताना सुहास गरुड, शेजारी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, सुनील गोडसे, लेफ्टनंट रुथा जोशी.

वार्ताहर
एकंबे

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थीनी स्वातंत्र्य, सुरक्षितता व भयमुक्त करणे हे पोलीस दलाचे कर्तव्य आहे. महिलांवर होणारे अत्याचार रोखण्याबरोबरच त्याला प्रतिबंध करण्यासाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असून, निर्भया पथकांमुळे महिलांमध्ये विश्वास निर्माण होण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास गरुड यांनी केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या मैदानावर शुक्रवारी पोलीस दल, महाविद्यालय आणि शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संयुक्त विद्यमाने निर्भया रॅली व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी अध्यक्षस्थानावरुन गरुड बोलत होते. रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, पोलीस निरीक्षक सुनील गोडसे, लेफ्टनंट रुथा जोशी यावेळी उपस्थित होत्या.

गरुड पुढे म्हणाले की, काही लोकांच्या विशेषत: युवकांच्या विकृत मानसिकता आणि दुय्यम वागणूक यामुळे महिलांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. शाळा, महाविद्यालय, नोकरी-व्यवसायासाठी बाहेर पडणाऱ्या तरुणी, महिलांची छेडछाड होण्याचे प्रकार घडत असतात, त्याला रोखण्यासाठी पोलीस दलाने स्थापन केलेले निर्भया पथक पूर्ण शक्तीनिशी काम करत आहे.

**उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास गरुड यांचे प्रतिपादन**

सुनील गोडसे म्हणाले, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थीनी स्वसंरक्षणासाठी तयार राहून छेडछाड करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी निर्भया पथकाची मदत घ्यावी. पोलीस दल आपल्याला मदत करण्यासाठी २४ तास उपलब्ध आहे.

प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत म्हणाले, महाराष्ट्रात इतर राज्यांच्या तुलनेमध्ये मुलामुलींमध्ये तुलनेने भेदभाव कमी आहे, पण काही ठिकाणी मुलगी आपल्या तोंडून स्वत:बद्दलच्या घटना सांगण्यास घाबरते, यासाठी त्यांना निर्भया पथक पूर्णपणे मदत करेल.

निर्भया पथकाच्या निर्मितीविषयी पोलीस नाईक दीपाली गुरव यांनी माहिती दिली. निर्भया पथकातील पोलीस नाईक इंदूताई घाडगे, वर्षाराणी शिंदे, दीपाली गिरी, हेमंत शिंदे, अजय गुरव यांच्यासह गोपनीय शाखेचे कर्मचारी किशोर भोसले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. देवकी भोसले यांनी आभार मानले.